**तातडीचे पत्र**

जा.क्र.सीपीएस/राकिदर/२०१६-१७/२८६/गुनि-५/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
दिनांक : ७ जून २०१६

प्रति,

**१. विभागीय कृषि सहसंचालक** ---------------------------------------(सर्व)
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** ---------------------------------(सर्व)
**३. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद** --------------------------(सर्व)

**विषय : सन २०१६-१७ करिता विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करण्यासाठी रासायनिक कीडनाशकांचे दराबाबत मार्गदर्शक सुचना ...**

**संदर्भ :** १. आयुक्तालयाचे पत्र क्र. गुनियो/गुनि ७/८ /कि.ना.नमुने तपासणी /२८८३/२०१३ दि. १९/०९/२०१३
२. आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सीपीएस/रा.किना.दर/२०१६-१७/२६३/गु.नि-५/२०१६, दि. २ जून २०१६
३. म.कृ.उ.वि.मं. मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र.जं.ना/कृ.आ./२०१६-१७/०३५५९/ दि. ०१/०६/२०१६

आयुक्तालयाचे परिपत्रक दिनांक २/०६/२०१६ नुसार विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करण्यासाठी रासायनिक कीडनाशकांचे पुरवठयाबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

आयुक्तालयाचे संदर्भिय पत्र दिनांक १९/०९/२०१३ नुसार **"कृषि उद्योग"** अधिनस्त महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड लि. अकोला येथे उत्पादीत केलेल्या कीडनाशकांचे नमुने काढण्यासाठी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, अकोला यांना प्राधीकृत करण्यात आले आहे, सदर पत्राची प्रत आपणासही पृष्ठांकीत केली आहे.

संदर्भिय मार्गदर्शक सुचना दिनांक २ जून २०१६ मधील परिच्छेद क्र. ३.अन्वये किडनाशकांची गुणवत्ता तपासणी अंतर्गत, तालुका स्तरावर रॅन्डम पध्दतीने कीडनाशकांचे नमुने काढून प्रयोगशाळेत नमुना तपासणीकरीता पाठविण्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाच्या संदर्भिय दिनांक १/०६/२०१६ चे पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आयुक्तालयाचे दिनांक १९/०९/२०१३ चे पत्रानुसार महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ अधिनस्त महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड लि.अकोला, येथे त्यांनी स्वतः उत्पादीत केलेल्या कीडनाशकांचे नमुने तपासणीसाठी जिल्हा गुणनियंत्रक निरीक्षक, अकोला, यांना उत्पादनस्थळी बॅचनिहाय नमुने काढण्यासाठी प्राधीकृत केले आहे. त्यांचेद्वारे ज्या बॅचेसचे नमुने काढण्यात आले असुन ते प्रमाणित आढळल्याचे अहवाल महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ आपणास सादर करेल, अशा **कृषि उद्योग स्वउत्पादीत कीडनाशकांचे नमुने तपासणीसाठी पुनश्चःतालुका स्तरावरुन काढण्याची आवश्यकता राहणार नाही.** सदर बाब केवळ महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड लि. अकोला येथे उत्पादीत कीडनाशकांचे मर्यादेत लागू राहील.

आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सीपीएस/रा.किना.दर/२०१६-१७/२६३/गु.नि-५/२०१६, दि. २ जून २०१६ मधील इतर मागदर्शक सुचना जशाच्या तशा लागु राहतील.

कृषि संचालक (नि.व.गुनि.)
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे १**

प्रत :-

**१. मा. अप्पर मुख्य सचिव**, (कृषि व पणन) कृषि व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, मत्सव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**२) मा. आयुक्त कृषि,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**३) उपमहाव्यवस्थापक (जंतुनाशके)** , महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी, दिनकरराव देसाई मार्ग,
गोरेगाव (पूर्व) मुंबई -६५ यांना त्यांचे पत्र दि. ३०/०७/२०१५ अन्वये माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१) **कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)/कृषि संचालक (फलोत्पादन)** यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव समादराने.

Chem /Rate Gen corr 2015-16